Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies SJIF2021=7.380 ISSN: 2319-4766

# भारतातील आदिवासींच्या प्रमुख समस्या

**डॉ. आर. व्ही. मोरे**

*समाजशास्त्र विभाग, स्व. पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, रिसोड. जि. वाशिम*

**सारांश**

*स्वातंत्र्पुर्व भारतात ब्रिटिश राजसत्तेच्या हातून प्रशासनाच्या कार्याच्या अनुषंगाने जी काही थोडीफार विकासात्मक कार्य पार पडली, त्याचा भारतातील नागरी समाजाला काहीअंशी लाभ मिळत गेला. ग्रामिण समाज मात्र उपेक्षित राहिला. पर्वतराजीवर,गिरीकंदरात राहणारा आदिवासी हा तर संपूर्णपणे दुर्लक्षित राहिला. याचे मुख्य कारण म्हणजे त्यांचेकडे लक्ष देउन ब्रिटिश साम्राज्यशाहीला कोणताच लाभ होणार नव्हता. परंतु त्याच ब्रिटिश शासनयंत्रणेत लहानमोठया प्रशासकिय पदावर कार्यरत असलेल्या तेथील लोकजिवनाची पाहणी करून जे संशोधनात्मक कार्य केले त्यांचे श्रेय मात्र त्यांना द्यावेत लागेल. त्यात प्रामुख्याने डब्ल्यु. व्ही. ग्रिगसन, आर. व्ही.रसेल, आर. टेंपल, ल्युसी स्मिथ, सी.यु. बिल्स, जॉन ड्रेक भारतात येणारे हौसी पर्यटक आदिवासी क्षेत्राला आवर्जून भेट देतात. आदिवासी लोकजिवनाचे जवळून निरीक्षण करतात. त्यातून काही प्रमाणात आदिवासींचे अध्ययन झाले आहे.*

*अनुसुचित जमातीमध्ये आदिवासी हे सर्वात मागासलेले, अशिक्षित, साधे जीवन जगणारे व जंगलात राहणारे लोक आहेत. ''या जमातींची निरक्षरता त्यांच्या अनेक समस्यांचे मुळ कारण आहे.निरक्षरतेमुळे त्यांच्यामध्ये अनेक अंधविश्वास व कुसंस्कार आढळतात. अशिक्षित असल्यामुळे आजही ते अंधकारमय जिवन जगत आहेत.*

## प्रस्तावना

आज आदिवासींच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय जिवनाशी निगडीत विभिन्न प्रश्न निर्माण होत आहेत. मनुष्याने संघटीत राहण्याचा, जगण्याचा आणि विविध सामाजिक संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न प्रारंभापासूनच केला आहे. या प्रयत्नाचा मागोवा घेण्यासाठी मानवाचे सांस्कृतिक जीवन कसे विकसित होत गेले याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. यासाठीच आदिवासी समुहाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचा अभ्यास करण्यास प्रारंभ झाला. काही संशोधक व अभ्यासकांनी ''भारतीय आदिवासी'' हे आपल्या अभ्यासाचे केंद्र बनविले. पूर्वी कधीही नव्हे, एवढया मोठया प्रमाणात संशोधकाने मागील दोन–तीन दशकात संशोधन झाली. हे सामाजिक शास्त्राच्या अभ्यासावरून दिसून येते.

आधुनिक कोणत्याही प्रगत समाजापेक्षा दुर्गम, डोंगराळ भागात राहणा–या, निरक्षर समाजाला उद्‌देशून आदिवासी समाज असे म्हटले जात आहे. आदिवासी समाजजिवनाचा जवळून अभ्यास करणा–या अनेक अभ्यासकांना याची प्रचिती आली आहे की, आदिवासी समाज सुधारलेल्या समाजाच्या तुलनेत निर्धन, निरक्षर असतील त्यांचे राहणे मागासलेले व रानटी असेल पण ते असंस्कृत नाहीत. त्यांचे आचार विचार व समाजव्यवस्था खरोखरच वाखाणण्यासारखे आहे. त्यांची स्वतःची अर्थपुर्ण संस्कृती आहे.

अलीकडच्या काळात आदिवासी हा शब्द विशिष्ट भाषा बोलणा—या, विशिष्ट जीवन पध्दतीने व परंपरांनी आणि शेकडो वर्ष जंगलपहाडात जीवन जगत असताना आपली धार्मिक व सांस्कृतिक मुल्ये जोपासणा—या मानवसमुहाची ओळख करून देणासाठी वापरला जातो. कधी अर्धनग्न राहून, कधी लंगोटी नेसून शिकार करण्यासाठी रानोमाळ वन—वन भटकल्यामुळे त्यांना वनवासी किंवा वन्य जमाती म्हणून ओळखण्याचा प्रघात पडला आहे. कोणी त्यांना उपहासाने 'अरण्यक' किंवा 'लंगोटे' म्हणून संबोधतात कोणी त्यांना 'गिरीजन' म्हणणेही योग्य समजतात.'आदिपुत्र' किंवा 'वनपुत्र' हयाही नावाने त्यांना ओळखल्या जाते. जंगलचे 'अनभिषिक्त राजे' म्हणूनही त्यांचा उल्लेख केला जातो.

**आदिवासी जमातींच्या समस्या**

भारतातील आणि विशेषत: महाराष्ट्रातील आदिवासींचे प्रश्न किंवा समस्या या त्यांच्या मूळ जीवनपध्दतीप्रमाणे आहेत. त्याशिवाय बदलेल्या काळानुसार आधुनिकतेमुळे नव्याने निर्माण झालेल्या समस्यासुध्दा आहेतच. या समस्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक राजकिय, धार्मिक शैक्षणिक आणि आरोग्यविषयक अशा आहेत.

**१. शिक्षणविषयक समस्या :—** आदिवासींच्या शैक्षणिक समस्या या तर फारच गंभीर स्वरूपाच्या आहेत. आदिवासींच्या शिक्षणासाठी सरकारी योजना, सुविधा अत्यंत चांगल्या असूनही मिळावे तेवढे यश शिक्षणाच्या बाबतीत मिळालेले नाही शासकिय आश्रमशाळेत न्याहारी, जेवणासह तेल, साबण इत्यादी साहित्य विद्यार्थ्यांना मिळते. परंतू त्यांची गुणवत्ता, पुरवठा, वर्षभर साठवणूक हे जसे समस्यांचे विषय आहेत, त्याचप्रमाणे ते शिजवून मुलांना देणे यासारखी कामेसुध्दा शिक्षकांवरच असल्याने शिक्षकांच्या समस्येत भरच पडली आहे. आदिवासींसाठी तयार होणारी पुस्तके ही शहरी भागात शहरी अभ्यासकांकडून होत असल्याने पुस्तकात दिलेले दाखले, उदाहरणे यासाठी आदिवासी विद्यार्थी अनभिज्ञच असतात. शिवाय आदिवासींची बोलीभाषा खुपच वेगळी असल्याने त्यांना मराठीतून शिकविणेही जड जाते. त्यातच राष्ट्रभाषेचा आग्रह अथवा इंग्रजीतून शिक्षण यामुळे शिक्षणाविषयीची नाराजीच वाढते. मेळघाट, अमरावती, गडचिरोलीमधील कोरकु, माडिया आदिवासी शाळांत शिकविणारे शिक्षक बहुतेक वेळा बाहेर गावातून केवळ नोकरीसाठी, गरजेपोटी आणि ब—याच वेळा बिगर आदिवासी असल्याने शिक्षकांच्या कामासही मर्यादा येतात. शिक्षकांना मुलांची भाषा, संस्कृतीविषयी माहिती नसते. शिवाय शिक्षक, विद्यार्थी यांचे चांगले नातेही निर्माण होवू शकत नाही. याशिवाय अन्य पायाभूत सुविधांविषयक समस्या या वेगळयाच आहेत आणि या सर्वांची परिणती म्हणून शैक्षणिक क्षेत्रात अपेक्षित यश दिसत नाही.

**२. आर्थिक समस्या**

**अ. स्थलांतरित शेती :—** आजकाल ही पध्दत फारशी अस्तित्वात राहिलेली नाही. पण एकवेळच्या त्यांच्या या जीवन पध्दतीतून निर्माण झालेली ही समस्या आहे. लाकडे जाळून त्यांच्या राखेत बी—बियाणे पसरून त्यात शेती करण्याची पध्दत अतिमागास आहे. त्यातून

येणारे उत्पन्न अगदी कमी असते. शिवाय या पध्दतीत जंगलाचा, वृक्षसंपदेचा विनाश मोठया प्रमाणावर होतो.

**ब. कामगार आणि मजूरी :—** जंगल कंत्राटदाराकडून आजुबाजुच्या परिसरात काम उपलब्ध होते. याशिवाय रस्त्यांची बांधणी, दुरूस्ती, साखर कारखान्यात किंवा उसतोडणी, द्राक्ष तोडणी, जंगली वनस्पती आणि औषधी वनस्पती तोडून आणून देणे यासारखे असंख्य व्यवसाय उपलब्ध झाले आहेत. यासाठी श्रमाचे, कष्टाचे काम करण्यासाठी दलालामार्फत मजूर म्हणून आदिवासी स्त्री—पुरूषांना आणले जाते. अत्यंत कमी मजूरीवर मोठया काळासाठी त्यांच्याकडून अधिक श्रम करून घेतल्या जातात. शिवाय या अनुषंगाने होणारे त्यांचे स्थलांतर ही फार मोठी समस्या आहे. कामासाठी एका ठिकाणाहून ब—याच मोठया संख्येने माणसे नेली जातात. परंतु काम झाल्यावर त्यांना गावापर्यंत जवळपासच्या ठिकाणापर्यंत आणून सोडले जात नाही. शिवाय या काळात होणारी रोगराई, कुपोषण इतकेच काय बाहेरील जगाशी होणा—या संपर्कामुळे वेश्यागमनामुळे उद्‌भवणा—या गुप्तरोगाची समस्या तर त्यांच्यासाठी जीवघेण्या ठरत आहेत. ठराविक काळासाठी होणारे स्थलांतर थोडेफार पैसे देवून जाते. परंतू त्यातही फसवणूक होतेच. शिवाय नंतर होणा—या आरोग्यविषयक समस्या अधिक गंभीर असतात.

**३. आरोग्यविषयक समस्या :—** आरोग्यविषयक समस्यांत दूषित पाणी, साथीचे आजार मदिरापन, आधुनिक वैद्यकिय उपचारांविषयी संभ्रम, भगत आणि वैदूवरील विश्वास या समस्या तर परिचित आहेत. परंतू परक्या लोकांशी संपर्क, आधुनिक समाज जीवनाशी ओळख, पैशांची लालूच, शरीर विक्री करून वेश्याव्यवसाय यामुळे गुप्तरोगाच्या प्रमाणात वाढ आणि यामुळे नवनवीन रोग, अगदी एड्ससारख्या आजारांची लागण या नविन समस्या निर्माण झाल्या आहेत.

**४. धर्म आणि जादूमुळे —हास :—** जीवनात न उलगडणा—या प्रश्नांसाठी धर्म व जादू यांचा त्यांना आधार वाटतो. त्यांच्या असण्यामुळे त्यांना मानसिक शांतता मिळत होती. त्यांचे व्यवहारिक मूल्य लक्षात न घेता केवळ अवैज्ञानिक अंधश्रध्देची बिरूदे लावून त्या उखडून टाकण्यात त्यांच्याच मनात याविषयी संभ्रम निर्माण होत आहे. कुठले नितिनियम पाळायचे व कुठले नाही, हे न समजल्याने ते गोंधळून जात आहेत.

**५. धर्मांतराची समस्या :—** शिक्षण, नोकरी, व्यवसाय विकासकामे यांच्या नावाखाली छोटी—मोठी कामे आदिवासी क्षेत्रात राबविली जातात. इंग्रजी शिक्षण घ्यावे लागते. हळूहळू त्यांचे धर्मांतरही होते. याच धारणेतून संपूर्ण नैरूत्य भारतातील आदिवासी जमाती या पूर्ण विकसित, परंतू ख्रिश्चन झाल्या आहेत. भारताच्या इतर राज्यांतही हा धोका वाढत आहे. परिस्थितीची सहायता त्यांना धर्मांतरापासून परावृत्त करू शकत नाही.

**६. राजकिय समस्या :—** आदिवासी जमातीत एक प्रकारचे राजनैतिक संघटन असते. प्रत्येक जमातीचे एक मंडळ असते. त्यांच्या सहायाने लोकांवर नियत्रंण ठेवणे, छोटया—मोठया संघर्षाचे निराकरण होत असते. परंतु आता अस्तित्वात आलेले सरकारी कायदे, पोलिस, सरपंच यामुळे जमातींच्या पंचायतीच अर्थ कमी झाला. पंचायतीच्या तोडग्याचे स्वरूप सर्वसंमत असे. ते महत्व आधुनिक न्यायमंडळाला मान्य नाही, परंतू त्याला स्विकारण्यावाचून पर्याय नाही.

**७. खोटया आदिवासींची समस्या :–** जितक्या सवलती अधिक तितका गैरवापर अधिक असा एक मतप्रवाह आढळतो. आदिवासींना मिळालेल्या घटनात्मक तरतुदींमुळे बिगरआदिवासींनी आपण आदिवासी आहेत, असे जाहीर करून प्रमाणपत्रे मिळवून सवलतीही मिळविण्याचे प्रकार घडू लागले आहेत. या गोष्टी जशा उजेडाज येवू लागल्या त्याप्रमाणे आदिवासी समाज जात पडताळणी पध्दतही सुरू झाली.

आदिवासींची नावे आणि अडनांव ही जरी त्यांची मोठी खूण असली, तरीही नावं–अडनांव बदलून आदिवासी असल्याचे दाखविले जाते. त्यामुळे त्यांच्यातील कुळी अथवा कूळ पध्दती, विवाह पध्दती देवदेवता, प्रथा–परंपरा यांचा मुद्देसूद, सातत्याने अभ्यास करून त्यांच्या जमातीची पडताळणी करता येते. तसेच त्यांच्या विवाहपध्दती, पूजा पध्दती या सर्वातून आणि या विषयीच्या माहिती संकलनांतून आदिम संस्कृतीची दालने उघडली जातात आणि त्याचा उपयोग त्याचा, खरेपणा ओळखण्यासाठी होतो. बहुतेक आदिवासींमध्ये मृत्यूनंतर पुरण्याची, दफन करण्याची प्रथा आहे. अगदी अलीकडे त्यांनी दहन प्रथा स्विकारली आहे. या आणि अशा पध्दतींचा उपयोगही त्यांचे खरेपण अथवा खोटेपण ठरविण्यासाठी उपयोगी ठरतो.

**निष्कर्ष :–** आदिवासींचा बाहय संस्कृतीच्या संपर्कामुळे नविन भाषांचा स्विकार केला जातो. त्यामुळे स्थानिक भाषेचा लोप होतो. यातूनही त्यांच्या सामाजिक– सांस्कृतिक जीवनात एक पोकळी निर्माण होते. स्वत:ची संस्कृती व भाषा यांचा अध:पात होतो.

आदिवासी आपली जमीन बिगर आदिवासींना विकू शकत नाही. आणि बिगर आदिवासी ही जमीन विकत घेवू शकत नाहीत. आदिवासींमधील शिक्षणाचा अभाव, आर्थिक कमजोरी यामुळे जमीन असूनही ती योग्य प्रकारे कसली जात नाही. पैशाच्या जोरावर जमिनीचा विकास होतो, पण फायदा धनिकचाच होतो. शिक्षण, नोकरी, व्यवसाय विकासकामे यांच्या नावाखाली छोटी–मोठी कामे आदिवासी क्षेत्रात राबविली जातात. इंग्रजी शिक्षण घ्यावे लागते. हळूहळू त्यांचे धर्मांतरही होते. अशा प्रकारे त्यांचे शोषण होते. त्यांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकिय अशा विविध समस्या निर्माण झाल्या आहेत.

**संदर्भगंथ**


१. डॉ. गारे गोविंद :– *आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ , सुगवा प्रकाशन –२०१३*

२. डॉ. गंगाणे वर्षा :– *आदिवासी स्त्रियांच्या आर्थिक समस्या व सामाजिक समस्या, रूचा प्रकाशन – २०१७*

३. डॉ. चव्हाण मोहन :– *आदिवासी साहित्य विमर्श, अनुग्या बुक्स पब्लिकेशन.–२०२०*

४. डॉ. भानावत महेन्द्र :– *आदिवासी लोक, श्रध्दा पब्लिशर अॅन्ड डिस्ट्रीब्यूटर दिल्ली.*

५. डॉ. आगलावे प्रदिप . :– *आदिवासी समाजाचे समाजशास्त्र श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.*


IQAC
Co-ordinator
Late Pushpadevi Patil Arts & Science
College, Risod Dist.Washim-444506

Pushpadevi Patil Arts & Sci College 722 Dist-Washim

Principal
Late Pushpadevi Patil Arts & Science
College Risod Dist-Washim